पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे-४११००७

परीक्षा / बी.ए. / बी.कॉम / बी.एस्सी / ०१४ दि. २४.१.२०१२

मा. प्राचार्य / प्राचार्या, सर्व संलग्न महाविद्यालये.
मा. संचालक / संचालिका, सर्व मान्यताप्राप्त संस्था.

विषय : अध्यादेश १६३ चा फायदा देणेबाबत....

महोदय / महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष सन २०११-२०१२ मध्ये द्वितीय / तृतीय वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान च्या लेखी परीक्षा दि.१०/०४/२०१२, २९/०३/२०१२ व २०/०३/२०१२ पासून सुरु होत आहेत.

प्रतिवर्षीप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील एन.एस.एस. / एन.सी.सी. स्पोर्टस् इत्यादींच्या संदर्भात विद्यापीठ अध्यादेश १६३ चा फायदा जे विद्यार्थी घेऊ इच्छितात अशा सर्व विद्यार्थ्यांचे शैक्षणीक वर्ष २०११-२०१२ चे एन.एस.एस. / एन.सी.सी. च्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत, तसेच सदर विद्यार्थ्यांचा कायम नोंदणी क्रमांक व बैठक क्रमांक अशी सर्व माहिती असलेली यादी व त्या प्रत्येक विद्यार्थ्यामागे त्यासाठी आवश्यक असलेले शुल्क रुपये १०/- प्रमाणे जेवढे पात्र विद्यार्थी असतील तेवढयांचा एकत्रित शुल्काचा डिमांड ड्राफ्ट मा. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे-७, यांचे नांवे वरील परीक्षा सुरु होण्यापूर्वीच विद्यापीठ कार्यालयात पाठविण्याची व्यवस्था करावी. कृपया डिमांड ड्राफ्ट वित्त विभागात जमा केल्यानंतरच संबंधित विद्यार्थ्यांची यादी व अध्यादेश १६३ चे फॉर्म संबंधित परीक्षा कक्षात जमा करावेत. यापुढे असेही कळविण्यात येते की, परीक्षा सुरु झाल्यानंतर कोणत्याही विद्यार्थ्याचा अशा फायद्यासाठी प्रचलीत नियमानुसार अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व विद्यापीठ परिपत्रक संदर्भ क्र. परीक्षा नियंत्रक / २७ / २०००, दि.२६/७/२००० नुसार विद्यार्थ्यांचे एन.एस.एस. / एन.सी.सी. सर्टिफिकेटस् चालू शैक्षणिक वर्षाचे म्हणजे शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ चे असणे अत्यंत आवश्यक आहे. तशी सर्टिफिकेटस् नसतील तर अध्यादेश १६३ च्या ७ गुणांचा फायदा संबंधित विद्यार्थ्यांना देता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी व सदर माहिती संबंधित विद्यार्थ्यांना देखील द्यावी.

अध्यादेश क्र.१६३ चे विहीत नमुन्यातील अर्ज विद्याशाखानिहाय, कायम नोंदणी क्रमांक व बैठक क्रमांक असलेली यादी व विद्याशाखानिहीय एकत्रित शुल्काचा डिमांड ड्राफ्ट सादर करणे आवश्यक आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक

विशेष सूचना :- परीक्षानिहाय वेगवगळया याद्या व विद्याशाखानिहाय स्वतंत्र डिमांड ड्राफ्ट पाठविणे गरजेचे आहे. याची नोंद घ्यावी.

प्रत माहितीसाठी :-१. सर्व उपकुलसचिव / सहा.कुलसचिव, परीक्षा विभाग.
२. विभाग प्रमुख, माहिती व व्यवस्थापन विभाग,
३. कक्षाधिकारी, परीक्षा वित्त विभाग.

URG/B.A./१